ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भास, कालिदास आणि भवभूती यांचा कन्याजन्माविषयीचा दृष्टिकोन

**डॉ. सौ. पौर्णिमा चंद्रकांत मोटे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**गोषवारा**

भास, कालिदास आणि भवभूती हे संस्कृतमधील प्रथितयश विद्वान आहेत. या कवींच्या साहित्याचा सखोल अभ्यास करीत असताना, त्यांच्या काव्य–नाटकादींमध्ये
स्त्री–विषयक विविध पैलूंचे दर्शन घडून येते. यापैकी केवळ कन्याजन्माविषयी या तिघांच्या भूमिकेचे तुलनात्मक विवेचन प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे. विषयाच्या अनुरोधाने पुत्रादिविषयक विचारांचा मागोवा घेणे देखील प्रस्तुत ठरते.

आताप्रमाणेच 'पुत्रच व्हावा' अशा प्रकारची अभिलाषा प्राचीन काळातही असलेली दिसते. मुलगी ही अवांछित अपत्य मानण्याच्या त्या काळातही भास, कालिदास आणि भवभूती या तिघांनीही तिच्याविषयी कुठे अनुद्गार काढलेले नाहीत किंवा तिरस्कार व्यक्त केलेला दिसत नाही. उलट तिच्याविषयी काळजी, कौतुकाची भावना व्यक्त केलेली आहे. भासादींच्या साहित्यातील हे विचार आनंददायी आहेत. आजच्या समाजव्यवस्थेलाही निकोप स्वरूप आणि संतुलन देणारे आहेत.

**संशोधन पद्धती**

'भास, कालिदास आणि भवभूती यांचा कन्याजन्माविषयीचा दृष्टीकोन' अभ्यासत असताना तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

**बीजशब्द**

कन्या, पुत्र, कन्याजन्म, माता, पिता.

**प्रास्ताविक**

साहित्यामध्ये मानवी जीवनाचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला पाहावयास मिळते. त्या त्या ठिकाणच्या समाजरचनेचे, समाजाच्या विशिष्ट अवस्थेचे सूचक असे हे प्रतिबिंब असते. अर्थातच त्या काळातील घटना व समाजव्यवस्था यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा साहित्यातून अभिव्यक्त होत असतो. ही महत्त्वाची भूमिका कलावंत जेव्हा आपल्या कलाकृतीतून रसिकांपर्यंत पोहचवितो,तेव्हा त्याच्या स्वतःच्या जीवनविषयक दृष्टिकोनाची, अनुभवाची, चिंतनाची जोडही त्याला मिळते. म्हणजेच कलावंताच्या कलाकृतीमध्ये दुहेरी गुंफण आढळते.

भास, कालिदास आणि भवभूती हे संस्कृतमधील मोठे कवी आहेत. ते वेगवेगळया काळांमध्ये होऊन गेले आहेत. त्यांनी लिहलेली काव्य–नाटके प्रसिद्ध आहेत. आजही समाजमनावर त्यांचा प्रभाव दिसून येतो. आज स्त्री–भ्रूणहत्येचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. वंशाला दिवा, सद्गती इ. कारणांसाठी मुलगाच हवा अशा पूर्वापार चालत आलेल्या भूमिकेचा प्रभाव आजही दिसतो. स्त्री–भ्रूणहत्येसंबंधी विविध कायदे, कठोर शिक्षा इ. उपाययोजना करूनही त्याबाबतची मानसिकता बदलत नाही. अपवाद वगळता सद्यःस्थितीतही भ्रूणावस्थेपासूनच कन्येच्या बाबतीत अशी उदासीनता व प्रतिकूलता दिसते. अशा स्थितीत भासादींच्या साहित्यात 'कन्याजन्मा'बाबत काय म्हटले आहे, हे मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत ठिकाणी करीत आहे.

**उत्कट पुत्राभिलाषा**

प्राचीन समाजात पुत्रप्राप्तीमध्ये जीवनाची इतिकर्तव्यता मानली जात असे.'न पुत्रात्परमो लाभः'– पुत्रप्राप्तीपेक्षा मोठा असा अन्य कोणताही लाभ नाही,अशी समाजधारणा होती. पुत्र व्हावा ही अपेक्षा भारतीय समाजात रूढ होती.अशा स्थितीत भासादींच्या साहित्यात पुत्राभिलाषेसंबंधी कोणते विचार व्यक्त झाले आहेत, त्याचा विचार येथे केला आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

ऋष्यशृंगादी ऋषींनी दशरथासाठी 'पुत्रकामेष्टी'अर्थात पुत्राच्या इच्छेने यज्ञ केल्याचे वर्णन रघुवंशात आढळते. ( डॉ.त्रिपाठी ब्रम्हानंद : कालिदास–ग्रंथावली : २००२ : रघुवंशम्: १४-४ ) याच महाकाव्यामध्ये पुत्रप्राप्तीच्या इच्छेने दिलीप राजाने सुदक्षिणेसह नंदिनी नावाच्या धेनूची सेवा केली आहे. ही धेनू प्रसन्न झाली असता राजाने तिच्याकडे वंशप्रवर्तक 'तनय' अर्थात पुत्राची मागणी केली आहे. धेनूनेही 'तथेति' असे म्हणून त्याची ही मागणी पूर्ण केली आहे. तसेच त्याने सुदक्षिणा राणीच्या ठिकाणी पुत्रप्राप्तीच्या अभिलाषेने पुंसवनादी क्रिया पार पाडल्याचे वर्णन आले आहे. ( डॉ.त्रिपाठी ब्रम्हानंद : कालिदास–ग्रन्थावली : २००२ : रघुवंशम् : ३-३० )

अभिज्ञानशाकुन्तलामध्ये धनमित्र व्यापाऱ्याच्या पत्नीचा पुंसवन विधी पार पाडल्याचा उल्लेख आला आहे. ( डॉ.वाळिंबे रा.शं. : अभिज्ञानशाकुन्तलम् : १९६८ अंक ६: पृ. १६० ) हा विधी पुल्लिंगी अपत्य जन्माला यावे यासाठी केला जात असल्याचे 'संस्कारप्रकाश' या ग्रंथात म्हटले आहे. ( डॉ.त्रिवेदी भवानीशंकर : संस्कारप्रकाश : १९८६ : पृ.१६६–१६७) सोळा संस्कारांपैकी हा एक संस्कार होय. 'पुं' म्हणजे पुरूष. अर्थात पुल्लिंगी अपत्य. 'सवन' म्हणजे जन्म देणे. गर्भामध्ये लिंग व्यक्त होण्यापूर्वी हा संस्कार केला जातो. यावरून हा विधी पुत्रप्राप्तीसाठी असल्याचे स्पष्टपणे दिसते. याचाच अर्थ पुत्रप्राप्तीसाठी केला जाणारा हा विधी कालिदासाच्या काळात केला जात होता.

एकूणच अशा प्रकारच्या विधी व कर्म यांच्या उल्लेखांमागे राज्यवारस व वंशवृद्धी ही प्रमुख कारणे असलेली दिसतात. याशिवाय उत्कट पुत्राभिलाषा हे एक कारण असल्याचे दिसते. पित्यासमवेत माताही अशी अपेक्षा करताना दिसते.

पुंसवन विधीप्रमाणे कन्याप्राप्ती व्हावी या उद्देशाने कोणत्याही प्रकारचा विधी किंवा यज्ञ केल्याचे वर्णन कालिदासाच्या साहित्यात आढळत नाही. असे असले तरी आताप्रमाणे स्त्रीगर्भ उदरात वाढत आहे म्हणून त्याला मारल्याचे कोठे आढळत नाही, ही जमेची बाजू वाटते. याप्रमाणे पुत्राविषयी मनोभिलाषा व्यक्त झालेली दिसते. या पाठोपाठ कन्याजन्माविषयी देखील जाणून घेण्यास उत्सुकता वाटते.

कन्याजन्मासंदर्भात भवभूती म्हणतो – 'स्त्रीजन्मलाभं जुगुप्सन्ते बान्धवाः।' (श्री. शर्माशास्त्री शेषराज : मालतीमाधवम् : १९९८ : पृ. ३०९ ) कन्या जन्माला आली, की बांधव निंदा करू लागतात. या संदर्भात डॉ. वा. वि. मिराशी म्हणतात. ( डॉ.वाळींबे.रा.शं : आभिज्ञानशाकुंन्तलम : १९६८ : अंक : ७-१७)'भवभूतीच्या काळी समाजरचना आणि परिस्थिती आतासारखीच होती. मुलगी जन्माला आली, की बांधवांना दुःखाचा धक्का बसे. मिराशींचे हे मत युक्त वाटते. भवभूतीने प्रस्तुत विधानातून कन्याजन्माच्या बाबतीत लोकांचे मत काय होते, ते सांगितले आहे. या विधानाची पार्श्वभूमी पाहता हे ध्यानात येते. मुलगी वयात आल्यानंतर तिच्या चिंतेने पित्याची, घरच्या नातेवाईकांची जी काही स्थिती होते, त्याचा परिणाम हा आजच्या काळासारखा त्याही काळात असलेला दिसतो. मुलीला अनुरूप वर मिळण्याची काळजी, तिच्या सुखाची वाटणारी चिंता अशा विचारांस कारणीभूत झालेली दिसते. कौटुंबिक उदात्त विचारांची अभिव्यक्ती मांडणाऱ्या स्वतः भवभूतीला मात्र कन्याजन्म तिरस्करणीय वाटत नाही. स्वीकृत कन्येचा उल्लेख, याशिवाय सीता व मालती यांच्या बालपणीच्या स्मृती यांचा त्याने केलेला उल्लेख यासारख्या गोष्टींवरून त्याचा याबाबतचा दृष्टिकोन व्यक्त होतो.

**'तनय'–'अपत्य'**

पुत्र प्राप्त झालेला मनुष्य स्वतःला कृतकृत्य मानू लागतो.

कालिदासाने अभिज्ञानशाकुन्तलात दुष्यंताच्या तोंडी पित्याच्या पुत्रस्पर्शादींच्या अनुभवांचे वर्णन केले आहे. या प्रसंगी तो म्हणतो ( डॉ.वाळिंबे.रा.शं.:अभिज्ञानशाकुन्तलम् :१९६८ : ७-१७ ) 'कसलेही कारण नसताना हसू आल्यामुळे ज्यांचे कळ्यांसारखे दात किंचित दिसत आहेत, बोबडया बोलामुळे ज्यांची बोलण्यांची धडपड आकर्षक दिसत आहे, आणि जे पित्याच्या मांडीवर बसण्यासाठी उतावीळ झाले आहेत, अशा पुत्रांच्या अंगावरील धुळीमुळे मलिन होणारे पुरूष खरोखर भाग्यशाली समजावयास पाहिजेत!'

प्रस्तुत ठिकाणी कालिदासाने 'तनय' हा पुत्रवाचक शब्द प्रयुक्त केला आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

याउलट, उत्तररामचरितात भवभूतीने अत्यंत समर्पक अशा उक्तीमधून 'अपत्य हे पति–पत्नीच्या अंतःकरणांना जोडणारा प्रेमदुवा होय', (हातवळणे : केळकर : उत्तररामचरितम् : १९६५ : ३-१७ ) असे मत व्यक्त केले आहे.त्याने अपत्याच्या या व्याख्येत मुलगा आणि मुलगी या दोहोंचाही समावेश केला आहे, असे म्हणता येते. दोहोंना संबोधून 'अपत्य' हे पद प्रयुक्त केले आहे. यातून त्याच्या व्यापक दृष्टीचा प्रत्यय येतो.

एकूण तत्कालीन समाजव्यवस्था, धर्मशास्त्राचे नियम, कवीचा दृष्टीकोन, पुरुषप्रधान समाजव्यवस्था इ. सारख्या घटकांचा प्रभाव हा अपत्यजन्मासंर्भात दिसून येतो. अशा प्रतिकूल घटकांवर मात करूनही काही पात्रे कन्याजन्माचे स्वागत करताना दिसतात. समाजव्यवस्थेसाठी मौलिक असा हा संदेश होय.

**कन्येयं कुलजीवितम्**

कालिदासाने कुमारसम्भवात पार्वतीच्या जन्मासंबंधाने वर्णन केले आहे. तिचा जन्म चराचर सृष्टीला आनंददायी ठरला. (डॉ. त्रिपाठी : कालिदास–ग्रन्थावली : २००२: कु.स. १-२३) रत्नांकुराने विदूर भूमी सुशोभित व्हावी,तद्वत पार्वतीच्या जन्माने माता मेना सुशोभित झाली. हा भाव शब्दबद्ध करताना कवी म्हणतो ( डॉ. त्रिपाठी : कालीदास–गंथावली : २००२ : कु.स. १-२४ )– 'सवित्री स्फुरत्प्रभामण्डलया चकासे। तया दुहित्रा सुतरां विदूरभूमिर्नवमेघशब्दादुद्भिन्नया रत्नशलाकयेव' या अत्यंत सुरस उपमेद्वारा कवीने मातेची कन्याजन्मामुळे होणारी कृतार्थता व्यक्त केली आहे. पिता हिमालयाने पार्वतीला संपत्तीप्रमाणे उत्पन्न केल्याचे म्हटले आहे. (डॉ. त्रिपाठी : कालीदास–ग्रन्थावली : २००२ :कु. स.१-२२ ) यामुळे हिमालय जणू पवित्र, विभूषित झाला. असे कालिदास म्हणतो. 'महीभृतः पुत्रवतोऽपि दृष्टिस्तस्मिन्नपत्ये न जगाम तृप्तिम्।। ( डॉ.त्रिपाठी : कालीदास–गंथावली : २००२ : कु.स. १-२७ ) हिमालय पुत्रयुक्त असूनही पार्वतीवर अधिक प्रेम करीत असे.

कुटुंबात मुलगा आणि मुलगी दोघेही असतील , तर बहुधा मुलीपेक्षा मुलाचे लाड अधिक केले जातात. बऱ्याचदा त्याच्या सगळया आवश्यक, अनावश्यक गरजा अधिकाधिक पुरविल्या जातात. या तुलनेने मुलीच्या बाबतीत कानाडोळा करण्याची प्रवृत्ती असते. अशा प्रकारचे चित्र आढळत असता हिमालय मात्र याला अपवाद दिसतो. तो असा भेदभाव तर करत नाहीच, उलट पार्वतीवर अधिक प्रेम करीत असलेला दिसतो.

हिमालय सप्तर्षीजवळ 'कन्येयं कुलजीवितम्।' ( डॉ.त्रिपाठीः कालिदास–ग्रन्थावली : २००२ : कु.स.६-८३ ) व्यक्त करतो. कन्या म्हणजे कुटुबांचे जीवन अर्थात आनंदच, हा भाव यातून व्यक्त होतो.

कन्येचा जन्म दुःखद, दोषास्पद, पापमूलक, क्लेशकारक मानण्याचे वातावरण सगळीकडे असताना कालिदासाने कन्येला 'कुलजीवित' असे म्हटले आहे. ही घटना अत्यंत आनंददायक, सुखदायक, समाजव्यवस्थेला निकोपपणा आणि संतुलन देणारी अशी आहे. काही व्यक्ती मुलीच्या जन्माचेही अंतःकरणपूर्वक स्वागत करीत होत्या. मुलगा व मुलगी यांच्यामध्ये भेदभाव न करता तिच्यावर प्रेमाचा वर्षाव केला जात होता. प्रस्तुतचे उदाहरण उत्तम आणि अनुकरणीय असे आहे. समाजव्यवस्थेत सगळेच असंतुलित मानसिकतेचे नव्हते, याचा प्रत्यय यामधून येतो. या ठिकाणी पार्वतीविषयी व्यक्त केलेल्या भावना हा आपल्या समाजापुढे ठेवण्यात आलेला महान आदर्श आहे. पार्वतीच्या जन्माचे स्वागत तिचे वडील करीत आहेत. ही घटना देखील पुरुषप्रधान व्यवस्थेत काहीशी अपवादात्मक तरीही आनंददायक असे म्हणता येईल.

**पित्याची भूमिका**

हिमालयासारख्या भाग्यवान पित्याची प्राप्ती पार्वतीला झाली होती. संपन्न अशा कुटुंबात ती मोठया लाडा–कौतुकात लहानाची मोठी झाली. वरती वर्णन केल्याप्रमाणे हिमालयाची ती लाडकी होतीच. पण माता मेनेनेही तिचे लाड केलेले होते. कुटुंबातही ती सर्वांची लाडकी होती. लहानपणी ती मैत्रिणींसमवेत मंदाकिनीच्या काठावर वाळूच्या ढिगांच्या साहाय्याने घरे तयार करीत असे. चेंडूने किंवा बाहुल्यांनी खेळत असे. ( डॉ.त्रिपाठीः कालिदास–ग्रन्थावली : २००२ : कु.स.१-२९) एकंदरीत पार्वतीचे बालपण सुखासमाधानात गेलेले दिसते. या वयात हसण्या–खेळण्याचा मनमुराद आनंद तिने लुटलेला दिसतो. थोडी मोठी झाल्यावर

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तिने अभ्यासाला सुरूवात केली. तेव्हा पूर्वजन्मातील संस्कारांच्या प्रभावाने तिला सर्व अभ्यासविद्या अनायास प्राप्त झाल्या. ( डॉ.त्रिपाठी : कालिदास–ग्रन्थावली : २००२ : कु.स.१-३०) याप्रमाणे बालपणातील रमणीय काळ संपत असतानाच तिने शैक्षणिक योग्यताही प्राप्त केल्याचे दिसते.

कालिदासाने हिमालय व पार्वती यांच्यामधील मधुर स्नेहभावाचे वर्णन केले आहे. पार्वतीला बालवयातील रमणीय अनुभूतींचा आस्वाद घेता आला, ही बाब उल्लेखनीय वाटते.

मूल मोठे झाल्यावरही त्याचे लहानपण आपण विसरत नाही. विशिष्ट प्रसंगी त्याच्या या वयातील आठवणी सुखावणाऱ्या वाटतात. उत्तररामचरीतात  सीतेच्या बालपणातील स्मृती भवभूतीने व्यक्त केल्या आहेत. जनक सीताशोकाने अत्यंत व्याकूळ होतो सीतेच्या बालपणासंदर्भात तो म्हणतो 'लहानपणाचे तुझे केव्हा रडणारे तर केव्हा हसणारे, थोडयाशा कोमल कळयांसारख्या दातांचे अग्रभाग दिसणारे मुखकमल जे अडखळत अर्थहीन आणि गोड बोलत असे ते मला अजूनही आठवते.'( हातवळणे : केळकर : १९६५ : उत्तरामचरितम~ ४-४).

जनक सीतेच्या बालसुलभ कृती बारकाईने, जाणीवपूर्वक न्याहाळत होता. या कृती त्याला आनंद देणाऱ्या ठरत होत्या. अशा मधुर स्मृतीमधून वडिलांचे आपल्या मुलीविषयीचे प्रेम व्यक्त झालेले दिसते.

मुलगी घरात असताना मिळणारा आनंद हिमलयादींच्या व्यक्तिमत्त्वातून समजतो. परंतु मुलगी अवांछित किंवा नकोशी वाटणारी असते. अशी समाजव्यवस्था आजूबाजूला असताना मुलीच्या मृत्यूने वडील कासावीस झाल्याने चित्रण भासाने बालचरितात केले आहे.

यशोदा व नंद यांची कन्या जन्मतःच मृत होते. पत्नीच्या नकळत तो तिला घेऊन तेथून बाहेर पडतो. तिच्याविषयी शोक व्यक्त करताना तो म्हणतो –'बाळे, आमच्या घराच्या लक्ष्मीमध्ये न रमता तिथून आम्हाला सोडून का बरे चाललीस ?' नंद इतका कासावीस झालेला दिसतो, की त्याला त्यावेळी दाटलेला अंधार शेकडो रेडयांच्या मेळाव्याप्रमाणे भासतो. पावसाळयाने चांदणे हरवल्यासारखे वाटते. ती रात्र त्याला निळी साडी नेसलेल्या, सर्वांग लपेटून झोपलेल्या गोपीसारखी भासते. सर्वत्र दाटलेली उदासीनता मुलीच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली दिसते.

नंदराजाची ही व्याकूळ अवस्था पाहता तो मुलीचा जन्म दुःखदायक मानत नव्हता. तो तिच्या जन्माचे स्वागत करायला आनंदाने तयार होता, असे चित्र दिसते. (डॉ.राय गंगासागर : १९८९ : बालचरितम् १-१९)

केवळ मातापिताच नव्हे तर इतरही वडीलधाऱ्या मंडळींना मुलीविषयी जिव्हाळा वाटत असल्याचे भवभूतीच्या वर्णनावरुन दिसून येते. मालतीचा पिता भूरिवसु यांची सहाध्यायिनी कामंदकी. हिने मालतीला लहानपणी खेळविले व शिकविले होते. त्यामुळे कामंदकी मलतीच्या बालस्मृतींमध्ये हरवून गेलेली दिसते. (डॉ. शर्मा शास्त्री शेषराज : १९९८ : मालतीमाधवम् :१०-२) तिच्याविषयीच्या विविध भाव – भावना कामंदकीच्या मनात गर्दी करु लागतात. ती म्हणते – 'स्तनपान सुटल्यापासून तुला मी हस्तिदंताच्या बाहुलीप्रमाणे खेळविले, शिकविले आणि वाढविले. तसेच मीच तुझा विवाह श्रेष्ठ व गुणवान वराशी जुळवून आणला. त्यामुळे साहजिकच तुलाही माझ्याविषयी आपल्या आईपेक्षाही जास्त ममता वाटत असे.' (डॉ. शर्मा शास्त्री शेषराज : १९९८ : मालतीमाधवम् :१०-५)

**कन्यापितृत्वं बहुवन्दनीयम्**

भासाने अविमारक नाटकामध्ये 'कन्यापितृत्वं बहुवन्दीनीयम् ।'(राय गंगासागर : वि.स. २०४५ : अविमारकम् १-९) असे कन्येच्या पित्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. हे वर्णन वाळवंटात हिरवळीचे बेट गवसावे त्याप्रमाणे सुखदायी, आनंददायी वाटते. अनेकदा कन्यापितृत्व हे निंदनीय मानले जाते. किंबहुना तसे मानण्याची प्रथा रूढ झाली होती. त्या प्रथेचा भारतीय मनावरील पगडा अजूनही दूर झालेला नाही. अशा स्थितीत कन्यापितृत्व हे नुसते वंदनीय म्हणणे हे देखील कमालीचे सुखद आहे. पण इथे तर कवी नुसते वंदनीय नव्हे तर बहुवन्दनीय म्हणतो आहे. हे विलक्षण स्वागतार्ह आहे. हे वर्णन भारतीय संस्कृतीला एक देखणा चेहरा देणारे आहे. कन्यानिंदेचा डाग थोडा का होईना पण पुसून टाकणारे आहे. स्त्री–पुरूषसंबंधाला निकोप संबंध मानणाऱ्या कोणालाही अभिमान वाटावा, असे हे विधान आहे.

**दारिकासु स्त्रीणामधिकतरः स्नेहो भवति**

आपल्या समाजात बहुतेक वेळा स्वतः स्त्रिया देखील मुलीच्या जन्माचा तिरस्कार करताना दिसतात. पण यामागे वात्सल्याचा अभाव हे कारण मानता येणार नाही. आजूबाजूच्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या दडपणामुळे स्त्रियांची मानसिकता अशा प्रकारची झालेली दिसते. स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे अनुभवली असल्यामुळे 'नको हा स्त्रीजन्म' अशा प्रकारची भावना त्यांच्या मनात तीव्र झालेली असते. पण स्त्रीहृदय म्हणून पाहायचे झाले तर निसर्गतः स्त्रीला आपल्या मुलीविषयी तिटकारा वाटत नाही. उलट, मुलीच्या स्त्रीत्वामुळे आईला एकप्रकारे मुलगी ही आपले स्वतःचेच एक प्रतिबिंब वाटत असते. अथवा जणू काही आपले स्वतःचेच दुसरे अस्तित्व असे वाटत असते आणि म्हणूनच स्त्रियांना मुलींविषयी अधिक स्नेह वाटतो. भासाने बालचरितात 'दारिकासु स्त्रीणामधिकतरः स्नेहो भवति।' ( डॉ.राय गंगासागर :१९८९ : बालचरितम् : अंक २ : पृ.४५) या शब्दात हे स्पष्ट केले आहे. कन्येविषयी तिचा हा जिव्हाळा यातून व्यक्त होतो. यामध्ये जीवशास्त्रीयदृष्टया आणि मानसशास्त्रीयदृष्टया देखील फार मोठे तथ्य आहे, असे म्हणता येईल. भासाचे हे वचन अत्यंत हृद्य, भावस्पर्शी आणि हळुवार असे आहे. स्वाभाविक वात्सल्याची उत्कटता दर्शविणारे आहे. भारतीय संस्कृतीला आणि समाजव्यवस्थेला एक उमदा आणि प्रसन्न चेहरा देणारे आहे.

**स्वीकृत कन्या ( Adopted Daughter )**

विवाहाच्या पश्चात पति–पत्नी यांना संततीची अभिलाषा असूनही जर ती प्राप्त होत नसेल, तर अशा वेळेस दुसऱ्याचे अपत्य दत्तक रूपात स्वीकारले जाते. अगदी फार पूर्वीपासून ही प्रथा समाजात प्रचलित असल्याचे आणि तिला मान्यताही असल्याचे दिसते.

कालिदास व भवभूती यांच्या साहित्यात वरील स्वरूपातील संततीच्या स्वीकाराचे उल्लेख आढळतात. भवभूतीच्या उत्तररामचरितात 'राजा दशरथाला शांता नावाची मुलगी झाली, तिला त्याने लोमपाद राजाला दत्तक म्हणून दिले', असा उल्लेख आढळतो. (हातवळणे : केळकर : १९६५ : उत्तमरामचरितम् : १-४) सामान्यतः एखादे अपत्य दत्तक म्हणून घ्यावयाचे असेल, तर मुलगा दत्तक घेण्याकडे अधिक कल असतो. लोमपाद राजाने मात्र मुलीला दत्तक म्हणून स्वीकारले आहे. त्याची ही कृती महत्त्वाची, प्रशंसनीय आहे, सद्यःस्थितीत निश्चितच अनुकरणीय आहे. आजच्या समाजव्यवस्थेला नवी दिशा देणारी आहे.

अभिज्ञानशाकुन्तलात विश्वामित्र आणि मेनका यांच्या संबंधातून जन्माला आलेल्या शकुंतलेचा मेनका त्याग करते, तेव्हा कण्वमुनींनी तिला मानसकन्येच्या रूपात स्वीकारून तिचे मोठया ममतेने पालनपोषण केले आहे. (डॉ. वाळिंबे रा.श : अभिज्ञानशाकुन्तलम् : १९६८ : अंक १ पृ.२२.) एक प्रकारे दत्तक कन्येसारखे नातेही या दोहोंबाबत मानता येईल.

अपत्यप्राप्तीच्या अभिलाषेमागे वंशवृद्धी हे महत्त्वाचे कारण दिसून येते. वंश हे दोन प्रकारचे असलेले दिसतात. शारीरवंश आणि विद्यावंश. शारीरवंश टिकविण्याच्या उद्देशाने बहुधा पुत्रप्राप्तीची इच्छा बाळगली जाते किंवा त्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. कण्वमुनींनी या उद्देशाने शकुंतलेचा स्वीकार केलेला नाही.

दुसरा वंश जो विद्यावंश हा गुरूचा ज्ञानप्रवाह पुढे नेतो. गुरू या दृष्टीने बहुधा पुरुष शिष्याची निवड करण्याची शक्यता असते. विवाहानंतर मुलगी सासरी जाणार असल्याने विद्यावंश खंडित होण्याची शक्यता असते. त्यामुळे कन्येची निवड न करण्यामागे कल असावा. मात्र यालाही कण्व अपवाद असलेले दिसतात. शकुंतला ही कण्वांचा विद्यावंश चालविणारी म्हणून तिच्याकडे पाहता येईल.

शकुंतलेसारख्या अनाथ, पोरक्या, सापडलेल्या मुलीचा स्वीकार कण्वांसारख्या आश्रमवासी ऋषीने केला आहे. ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. मुलीकडे पाहण्याचा अनुकूल दृष्टिकोन व्यक्त करणारी आहे. स्वतःच्या अपत्याप्रमाणे मानून तिला लहानाचे मोठे केले आहे. पित्याची भूमिका पार पाडताना त्यांनी तिला आतिथ्यशीलता, भूतदया, निसर्गप्रेमादींचे उत्तम पाठ दिले आहेत. तशा प्रकारचे संस्कार तिच्यावर केले आहेत. प्राण्यांच्या बाबतीत दयाबुद्धीने वागण्याची शिकवणही त्यांनी तिच्या ठिकाणी रूजवलेली आहे. एकूणच मानसकन्या म्हणून तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या सुयोग्य जडणघडणीकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिलेले दिसते. अशा स्थितीत प्रतिकूल दैवाने तिला दगाफटका करू नये, याची काळजी त्यांनी घेतली आहे. तिच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

प्रतिकूल दैवाचे शमन करण्यासाठी ते सोमतीर्थाला गेलेले दिसतात. एकूणच स्वतःची मुलगी म्हणून शकुंतलेचा स्वीकार करणाऱ्या कण्वांच्या कृतीमागे कोणताही स्वार्थी हेतू दिसत नाही. त्यांच्या ह्रदयाची विशालता, स्नेहार्द्रता ही निश्चितच भावणारी आणि अनुकरणीय आहे.

याप्रमाणे मुलाऐवजी मुलगी दत्तक रूपात स्वीकारणाऱ्या कण्वांचे व लोमपाद राजाचे उल्लेख कवींनी केले आहेत. यावरून सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात कन्येचे असलेले महत्व दिसून येते. 'वृद्धावस्थेतील आधार', 'कुलाचा गौरव' किंवा 'वंशाचा दिवा', 'सद्गती' यासारख्या कारणांसाठी पुत्रच हवा ही जी मानसिकता बऱ्याचदा दिसून येते, तिला कण्व व लोमपाद राजा अपवाद असलेले दिसतात. प्रस्तुतची उदाहरणे सद्यःस्थितीतही निश्चितच उद्बोधक आहेत.

भासाच्या साहित्यात वरीलप्रमाणे कन्यास्वीकाराचे प्रत्यक्ष उल्लेख आढळत नाहीत. तथापि एका वेगळया परिस्थितीत, विशिष्ट उद्देशाने वसुदेवाने आपला पुत्र नंदाला देउन त्याऐवजी त्याची मृत कन्या स्वीकारल्याचे वर्णन बालचरितात आले आहे.

**निष्कर्ष**

या सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, 'पुत्रच व्हावा' अशा प्रकारची अभिलाषा आज जशी आढळते, तशाच प्रकारची अभिलाषा प्राचीन काळातही असलेली दिसते. या दृष्टीने पुत्रकामेष्टी यज्ञ, पुंसवन विधी पार पाडले जात. कालिदासाने त्याच्या साहित्यात याचे वर्णन केले आहे. तथापि स्त्रीगर्भ आहे, म्हणून गर्भाची हत्या केल्याचे वर्णन भासादींच्या साहित्यात कुठेही आढळत नाही. एवढेच नव्हे, तर कन्याजन्माचे आनंदाने स्वागत केल्याची अनेक उदाहरणेही या अभ्यासातून पुढे आली आहेत. आज समाजाच्या विविध स्तरांमध्ये स्त्री–भ्रूणहत्येचे प्रमाण वाढत चालले आहे. त्या दृष्टीने ही गोष्ठ निश्चितच बोधप्रद आहे. कालिदासाने 'कन्येयं कुलजीवितम्' असे म्हटले आहे.कन्याजन्मानंतर आनंदसोहळयाचे वर्णन त्यांनी केले आहे. कालिदास व भवभूती यांनी स्वीकृत कन्येचे उल्लेख केले आहेत . भासाने मात्र अशा स्वरूपाचा उल्लेख केलेला नाही.

एकूणच भासादींच्या साहित्यातील कन्याजन्माविषयीचे विचार आनंददायी आहेत. मुलगी 'नकोशी' मानणाऱ्या समाजव्यवस्थेला निकोप स्वरूप आणि संतुलन देणारे आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :**

१- रघुवंशम् : कालिदास – ग्रंन्थावली : संपादक डॉ.त्रिपाठी ब्रम्हानंद : चौखम्बा सुरभारती प्रकाशन ,वाराणसी, पुनर्मुद्रित संस्करण २००२ ई.

२. अभिज्ञानशाकुन्तलम् : डॉ.वाळिंबे रा,शं. : जोशी आणि लोखंडे प्रकाशन, दुसरी आवृत्ती, १९६८ः

३.संस्कारप्रकाश : डॉ. त्रिवेदी भवानीशंकर : पं. श्रीलालबहादूरशास्त्री –केंद्रिय–संस्कृत –विद्यापीठम् ,नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती ,१९८६.

४.मालतीमाधवम् : श्री ,शर्मा शास्त्री शेषराज : चौखम्बा संस्कृत सीरीज, तृतीय आवृत्ती १९९८.

५. भवभूती : म.म.डॉ.मिराशी : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती ,१९६८.

६.उत्तररामचरितम् : संपादक : हातवळणे ,केळकर प्रथम आवृत्ती १९६५.

७.कुमारसम्भवम् : कालिदास–ग्रंन्थावली :संपादक डॉ. त्रिपाठी ब्रम्हानंद : चौखम्बा सुरभारती प्रकाशन ,वाराणसी , पुनर्मुद्रित संस्करण २००२ ई.

८.बालचरितम् : डॉ. राय गंगासागर : चौखम्बा संस्कृत सीरीज , वाराणसी , प्रथम आवृत्ती १९८९.

९.अविमारकम् : संपादक राय गंगासागर : चौखम्बा संस्कृत सीरीज , वाराणसी , प्रथम आवृत्ती विक्रम संवत २०४५.